नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३१३ Issue - 313 | वार मंगळवार दि. १ एप्रिल २०२५ Blow- Tuesday Date 1 April 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यासाठी यंदाचा उन्हाळा ठरणार तापदायक, उष्मालाटांचे दिवस अधिक

### महाराष्ट्रासह देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : यंदाचा उन्हाळा महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांसाठी तापदायक ठरण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) सोमवारी वर्तवली. 'एप्रिल ते जून या उन्हाळ्याच्या हंगामात महाराष्ट्रासह देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असून, उष्णतेच्या लाटांचे दिवसही सरासरीपेक्षा जास्त असू शकतात', असे 'आयएमडी'ने म्हटले आहे.

एप्रिल महिन्यासह पुढील तीन महिन्यांच्या हवामानाचा अंदाज 'आयएमडी'ने सोमवारी जाहीर केला. त्यानुसार एप्रिल महिन्यात आणि एप्रिल ते जून या उन्हाळ्याच्या हंगामात दिवसा आणि रात्री तापमानाचा पारा सरासरीच्या वर राहण्याची शक्यता आहे. 'आयएमडी'ने दिलेल्या माहितीनुसार, पुढील तीन महिन्यांमध्ये दक्षिण मध्य महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळचा दक्षिण भाग या ठिकाणी कमाल तापमान सरासरीच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. राज्यात आणि देशात इतरत्र कमाल तापमान सरासरीच्या वर राहण्याची शक्यता आहे. याच काळात देशाच्या बहुतांश भागांमध्ये किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदले जाण्याची शक्यता अधिक आहे.


यंदाचा उन्हाळा महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांसाठी तापदायक ठरण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवली आहे. 'एप्रिल ते जून या उन्हाळ्याच्या हंगामात महाराष्ट्रासह देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असून, उष्णतेच्या लाटांचे दिवसही सरासरीपेक्षा जास्त असू शकतात,' असे 'आयएमडी'ने म्हटले आहे.

एप्रिल महिन्यासह पुढील तीन महिन्यांच्या हवामानाचा अंदाज 'आयएमडी'ने सोमवारी जाहीर केला. या अंदाजानुसार एप्रिल महिन्यात आणि एप्रिल ते जून या उन्हाळ्याच्या हंगामात दिवसा आणि रात्री तापमानाचा पारा सरासरीच्या वर राहण्याची शक्यता आहे. 'आयएमडी'ने दिलेल्या माहितीनुसार, पुढील तीन महिन्यांमध्ये दक्षिण मध्य महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळचा दक्षिण भाग या ठिकाणी कमाल तापमान सरासरीच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. राज्यात आणि देशात इतरत्र कमाल तापमान सरासरीच्या वर राहू शकते. याच काळात देशाच्या बहुतांश भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदले जाण्याची शक्यता अधिक आहे. एप्रिल ते जून या काळात महाराष्ट्रासह मध्य, वायव्य, उत्तर आणि पूर्व भारतामध्ये उष्णतेच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहू शकतात. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा सात ते आठ दिवस जास्त असू शकतात. एप्रिलमध्ये कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि लगतच्या मराठवाड्यात सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता अधिक असल्याचेही अंदाजात म्हटले आहे.

## उप अभियंता बिडला 'रॉक यारु कुडाला अवरदू बील कुडाला'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर ( विशेष प्रतिनिधी ) मार्च अखेरच्या कामास गती आले असून जे कामे मार्च अखेर पूर्ण करायचे आहेत त्याचे धावपळ चालू आहे मात्र जिल्हा परिषद उप अभियंता बिडला रॉक यारू कुडाला अवरीगे बिडाला म्हणाल्या सारखं काम चालू आहे.



बील वर सही घेण्यासाठी ग्रामीण भागातील सरपंच, उपसरपंच, ठेकेदार यांची धावपळ चालु असून उप अभियंता यांच्या कार्यालयात सही साठी टक्केवारी देऊन रांगेत उभे राहावे लागत आहे यात मात्र विशेष आहे ज्यांनी जास्त टक्केवारी देईल त्याचे सही पहिले व त्यांना थंड मठ्ठा पाजून पाठवले जास्त असल्याचे माहिती सूत्राने दिले आहे ज्यांनी प्रमाणे चांगल्या गुणवत्तेचे काम केले आहे मात्र टक्केवारी देण्याचे इच्छा नाही यांचं मात्र मोठ पंचाईत झाली आहे त्यांना तीन तीन तास ताटकळत बसलं तरी त्याच्या बील वर सही होईना.

मागासवर्गीय लोकप्रतिनिधी त्रास देत असल्याचे बातमी प्रकाशन झाल्याने मुंबई येथील शिष्टमंडळ संबंधित मंत्र्याचे भेट घेऊन चौकशी समिती स्थापन करण्याचे मागणी करून याबाबत त्वरित कार्यवाही करण्यासाठी अनु. जाती आयोगाकडे लेखी तक्रार देण्यात आले आहे.

कार्यालयीन वेळापत्रक व त्याप्रमाणे अधिकारी हजर असणे आवश्यक असून पगार शासनाचे काम खाजगी कार्यक्रम गायनाचे असे गत होत आहे त्यामुळे एक तर कार्यालयीन वेळेत हजर न राहता दुपारच्या वेळी एसी गाडीमध्ये बसून येतात मात्र ग्रामीण भागातील लोकांना उन्हात मरत यावं लागतं तेवढ्या उन्हात येऊन देखील अखेर उप अभियंता बिडला रॉक यारू कुडाला अवरदू बील कुडाला असे अवस्था करून ठेवल्याने लोक प्रतिनीधी यांना अवघड झाले आहे साधं एस्टमेट वर सह्या करण्यासाठी तीन तीन तास लोकांना त्रास देत आहेत हे लोक सेवक नसून लोकांचे मालक झाल्याचे चित्र दिसत आहे.

येत्या काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही करतात का तेरी ही चूप मेरी ही चूप या प्रमाणे चालतात हे पाहणे आवश्यक आहे यापुढे देखील मागासवर्गीय संघटनेने न्याय हक्कासाठी लढा चालू ठेवणार असल्याचे सांगितले आहे.

## मँगोनेटच्या नोंदणी निर्यातीत देशात रत्नागिरी जिल्हा अव्वल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रत्नागिरी : देशातील निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी करण्यात आली आहे. मँगोनेट या प्रणालीद्वारे ही नोंदणी करण्यात आली आहे. संपुर्ण देशात आंबा निर्यातीत महाराष्ट्र राज्य अव्वल ठरले असून, राज्यातील १७ हजार ६९१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील ६ हजार ९९६ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, रत्नागिरी जिल्ह्याने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. त्यामुळे देशातील सर्वांत जास्त आंबा उत्पादन आणि निर्यात महाराष्ट्र राज्यासह रत्नागिरी जिल्ह्यातून होणार आहे.



भारतातील सर्वांत जास्त आंबा उत्पादन हे महाराष्ट्रात होते. जे शेतकरी निर्यातक्षम आंबा उत्पादन करतात अशा शेतकऱ्यांनी आपल्या आंबा बागांची आणि शेतीची नोंदणी मँगोनेट प्रणालीद्वारे नोंदणी करून घेतली आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, देशात एकूण २३ हजार १५७ शेतकऱ्यांनी निर्यातक्षम बागांची नोंदणी करण्यात आलेली आहे. मात्र यातील १७ हजार ६९१ शेतकरी हे केवळ महाराष्ट्रातील आहेत. त्यामुळे निर्यातीसाठी ७६ टक्के शेतकरी हे महाराष्ट्रातील आहेत. त्यातील सर्वात जास्त म्हणजे ६ हजार ९९६ शेतकरी हे रत्नागिरी जिल्ह्यातील आहेत.

राज्यातील १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मिळून १७ हजार ६९१ बागांची नोंद केल्या आहेत. त्यातील सर्वांत जास्त बागा या रत्नागिरी जिल्ह्यातील असून, येथील ६ हजार ९९६ बागांची नोंद मँगोनेट प्रणालीद्वारे करण्यात आली आहे. तर बीड जिल्ह्यातील सर्वांत कमी म्हणजे २२ बागा नोंदविण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्वांत जास्त आंबा उत्पादन घेणारा जिल्हा म्हणून रत्नागिरी जिल्ह्याची ओळख देशभर झाली आहे.

## सुधारित वक्फ विधेयक आज लोकसभेत मांडलं जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वक्फ बोर्ड विधेयकावरून मागील काही दिवसांपासून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. वक्फ बोर्ड विधेयकाला १४ बदलांसह मंत्रिमंडळाने २७ फेब्रुवारीला मंजुरी दिली. त्यानंतर हे विधेयक संसदेत मांडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर ते विधेयक संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. संसदीय समितीने काही बदल सुचवले होते. त्यानंतर पुन्हा १४ बदलांसह सुधारित वक्फ बोर्ड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. आता २ एप्रिल रोजी हे वक्फ विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे.




वक्फ विधेयकाला याआधी विरोधकांनी जोरदार विरोध केला होता. यानंतर आता पुन्हा एकदा सुधारित वक्फ विधेयक २ एप्रिल रोजी लोकसभेत मांडलं जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडे टीव्हीने दिलं आहे. त्यामुळे आता हे विधेयक संसदेत मंजूर होणार का? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे.

दरम्यान, संसदेत विधेयक सादर करण्यापूर्वी भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ मंत्री विरोधी इंडिया आघाडीच्या नेत्यांशी चर्चा करणार असल्याची देखील शक्यता वर्तवली जात आहे. तसेच संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपणार आहे. त्याआधी म्हणजे २ एप्रिल रोजी हे विधेयक संसदेत मांडण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच वक्फ बोर्ड विधेयकाला अंमलात आणण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभा अशा दोन्ही सभागृहने मंजूर करणं आवश्यक आहे. वक्फ बोर्ड विधेयकावरून काँग्रेसने काही दिवसांपूर्वी एक निवेदन जारी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर जोरदार टीका केली होती. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश निवेदनात म्हटलं की, वक्फ बोर्ड (दुरुस्ती) विधेयक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा संविधानावरील आणखी एक हल्ला आहे. हे विधेयक खोटा प्रचार पसरवून समाजातील सामाजिक सलोखा भंग करणे आणि अल्पसंख्याक समाजाच्या परंपरांना बदनाम करून निवडणुकीच्या फायद्यासाठी ध्रुवीकरणाची परिस्थिती निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचं जयराम रमेश यांनी म्हटलं होतं. वक्फ बोर्ड विधेयकाचा उद्देश केंद्रीय पोर्टलच्या माध्यमातून वक्फ बोर्डाच्या मालमत्ता, संपत्तीची नोंदणी करण्यात सुलभता आणण्याचा आहे. १८ फेब्रुवारी २०१४ या दिवशी हे विधेयक राज्यसभेत मांडण्यात आलं होतं.

## राज्यावर अवकाळीचे ढग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे आणि ओडिशापासून तमिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील पाच दिवस राज्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊन वादळी वारे, ढगांच्या गडगटासह अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मंगळवार आणि बुधवारी राज्याच्या बहुतांश भागांत गारपीट होण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरावरून राज्याच्या दिशेने बाष्पयुक्त वारे येत आहेत. ओडिशापासून तमिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील पाच दिवस राज्यभरात ढगाळ वातावरण निर्माण होणार आहे. मंगळवार आणि बुधवारी राज्यात पावसाचा जोर जास्त राहणार आहे.

राज्याच्या बहुतांश भागात ४० ते ६० किलोमीटर प्रती तास वेगाने वादळी वारे वाहून ढगांच्या गडगटासह अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

### शेकडो लोकांना त्यांनी डेब्रिजखालून सुखरूप बाहेर काढलं

### म्यानमार व थायलंडने देशात आणीबाणी जाहीर


## म्यानमारमध्ये दोन हजारांहून अधिक भूकंपबळी, साडेतीन हजार नागरिक जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : म्यानमार व थायलंडमध्ये तीन दिवसांपूर्वी झालेल्या भूकंपाने मोठा विध्वंस केला आहे. या भूकंपाचं केंद्र म्यानमारमध्ये असल्याने या देशात मोठी जीवित व वित्तहानी झाली आहे. शेकडो इमारती कोसळल्या आहेत, हजारो घरं ढासळली आहेत. या भूकंपानंतर बाधित परिसरात बचाव मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत. बचाव पथकातील हजारो कर्मचारी व लष्कराचे जवान गेल्या तीन दिवसांपासून ढिगाऱ्याखाली अडकेल्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत शेकडो लोकांना त्यांनी डेब्रिजखालून सुखरूप बाहेर काढलं आहे. तसेच अनेक मृतदेह देखील बाहेर काढण्यात आले आहेत.

म्यानमारमधील लष्करी सरकारने सांगितलं आहे की या भूकंपात १,७०० नागरिकांचा मृत्यू झाला असून, ३,५१४ नागरिक जखमी झाले आहेत, तर १५० हून अधिक जण बेपत्ता आहेत. मात्र, तिथल्या स्थानिक प्रसारमाध्यमांनी म्हटलं आहे की या भूकंपात २,०२८ जणांचा बळी गेला आहे. जखमींची संख्या ३,६०० हून अधिक आहे.

म्यानमार सरकारचे प्रवक्ते मेजर जनरल जॉ मिन तुन यांनी सरकारी वृत्तवाहिनी एमआरटीव्हीला सांगितलं की या भूकंपात ३,४०० जण जखमी झाले आहेत. तर १,६४४ जण मृत्यूमुखी पडले आहेत. याचबरोबर ३०० हून अधिक जण बेपत्ता असून आम्ही त्यांचा शोध घेत आहोत.



म्यानमारमधील दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर असलेल्या मंडालेपासून १७.२ किमी अंतरावर भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपाचे लागोपाठ सात हादरे बसले, त्यापैकी ७.७ (रिष्टर स्केल) तीव्रतेचा सर्वात मोठा धक्का होता. भूकंपानंतर म्यानमार व थायलंडमध्ये अनेक इमारती कोसळल्या आहेत. शेकडो घरं उद्ध्वस्त झाली आहेत. दुभंगलेले रस्ते, उखडलेले महामार्ग, कोसळलेले पूल असं चित्र भूकंपग्रस्त भागांत दिसत आहे. म्यानमारमधील लष्करशाहीने भूकंपानंतर सहा प्रांतांत आणीबाणीची घोषणा केली आहे. येथील लष्करशाही सरकार लोकांना वाचवण्यात, सुनियोजित बचाव मोहिमा आखण्यात सपशेल अपयशी ठरल्याची टीका आंतरराष्ट्रीय पातळीवरून होऊ लागली आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने (णडऋड) दिलेल्या माहितीनुसार हा भूकंप १० किलोमीटर खोलीवर होता. भूकंपाची खोली फार नसल्यामुळे त्याची तीव्रता अधिक होती. पहिल्या ७.७ रिष्टर स्केलच्या भूकंपापाठोपाठ ६.४ तीव्रतेचा आणखी एक भूकंप झाला. या भूकंपानंतर म्यानमार व थायलंडने देशात आणीबाणी जाहीर केली. म्यानमारला लागून असलेल्या चीनच्या नैऋत्य युनान प्रांतातही भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भागात थोडी वित्तवाहानी झाली आहे. यासह भारताच्या पश्चिम बंगाल, मणिपूर या राज्यांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. बांगलादेशातील भूकंपाचे धक्के बसले.

## संपादकीय....

### अवकाळीचे सावट

बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे आणि ओडिशापासून तमिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील पाच दिवस राज्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊन वादळी वारे, ढगांच्या गडगटासह अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मंगळवार आणि बुधवारी राज्याच्या बहुतांश भागांत गारपीट होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरावरून राज्याच्या दिशेने बाष्पयुक्त वारे येत आहेत. ओडिशापासून तमिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील पाच दिवस राज्यभरात ढगाळ वातावरण निर्माण होणार आहे. मंगळवार आणि बुधवारी राज्यात पावसाचा जोर जास्त राहणार आहे. राज्याच्या बहुतांश भागात ४० ते ६० किलोमीटर प्रती तास वेगाने वादळी वारे वाहून ढगांच्या गडगटासह अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मंगळवार आणि बुधवारी राज्यात पावसाचा आणि गारपिटीचा जोर जास्त राहील. राज्यात कमाल तापमान ३५ ते ४२ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. बाष्पयुक्त वातावरण आणि तापमान वाढीमुळे जास्त उंचीचे ढग निर्माण होत आहेत. जास्त उंचीच्या ढगांमुळे विजांच्या कडकडाट आणि गारपीट होण्याची शक्यता आहे.

# गावखेड्यांचे राजकारण ढवळून निघणार! जिल्ह्यातल्या ८७० ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत

## बुलढाणा जिल्ह्यातील ८७० ग्रामपंचायत सरपंच पदाच्या २०२५ ते २०३० पर्यंत निवडणूक होणाऱ्या सरपंच पदाचे आरक्षण येत्या १६ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात येणार आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्यातील गावखेड्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या ग्रामपंचायतीचे राजकारण पुढील काही दिवस पेटणार आहे. अर्थात राजकारण कितीही पेटले तरी त्याचा आरक्षण सोडती वर काहीही परिणाम होणार नाहीये..कारण आरक्षण सोडतीची प्रक्रिया पूर्णपणे प्रशासकीय यंत्रणेच्या हातात असून ती पारदर्शी होणार आहे..२०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकी द्वारे गठित ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत १६ एप्रिलला होणार आहे. यासंदर्भातील अधिसूचना ग्राम विकास विभागाने ५ मार्च रोजी जारी केली आहे. आता या अधिसूचनेची अंमलबजावणी जिल्हा यंत्रणेने सुरू केली आहे.

२०२५ ते २०३० या काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी सरपंच पदाचे आरक्षण १६ सोडत एप्रिलला होणार आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यातील ८७० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत निघणार आहे. संबंधित तहसील कार्यालयांमध्ये ही आरक्षण सोडत निघेल. शासन निर्णयातील तरतुदीनुसार सर्व तहसीलदारांनी किमान ३ दिवस आधी सरपंच पदाच्या आरक्षणाबाबतची सूचना संबंधित ग्रामपंचायतच्या सूचना फलकावर लावणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान महिलांचे आरक्षण बुलढाणा येथे २८ एप्रिलला काढण्यात येणार आहे.




## श्री स्वामी समर्थ प्रकटदिन

# स्वामींच्या प्रकट दिनाविषयीची खरी हकीकत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

स्वामी समर्थ महाराज कधी आले, कोठून आले, ते कोण होते या बद्दल कोणालाच काही माहिती नाही पण स्वामीसुत नावाचे त्यांचे एक आतिशय महान भक्त होऊन गेले. त्यांना स्वामी समर्थ आपला मुलगा मानायचे त्यांच्या तर त्यांच्या आनुभावावरून आपल्याला समजेलच कि स्वामी कसे प्रकटले. तर स्वामींच्या प्रकटण्याची हकीकत आशी.

'शेकडो वर्षापूर्वी एक पंजाब प्रांतात हस्तिनापुर पासून १२ कोस (जवळपास २४ कि. मी. अंतरावर) छेली खेडा नावचा गाव होता. त्याठिकाणी विजयसिंग नावाचा एक लहान मुलगा आपल्या भाऊ आणि भावजय बरोबर राहायचा. तो मुलगा कोणाही बरोबर मिसळायचा नाही तर तिथून थोड्याश्या अंतरावर असणाऱ्या साधारण पडक्या आश्या जागेत एक खूप मोठा वटवृक्ष होता त्यात एक छोटीशी दिवळी होती आणि त्यात एक छोटी गणपतीची मूर्ती होती, तर तो विजयसिंग खुप खिशात गोट्या भरून तिथे जायचा आणि त्या गणपती बरोबर खेळायचा पण तो मुलगा गणपती ला आपला मित्र मानून त्याचाही डाव स्वतः वरच घेऊन खेळायचा असेच एक दिवस जात होते आणि त्या परमात्म्याला आपला आविष्कार दाखवण्याची गरज वाटू लागली आणि त्याने विजयसिंग ला कारण बनवून आपला आविष्कार दाखवला. तर तो दिवस होता चित्र शुद्ध द्वितीया. आणि विजयसिंग रोजच्या आपल्या पद्धतीने या हि दिवशी तिथे गेला गणपती बरोबर पण आज अचानक त्याच्या मनात आले कि रोज आपणच खेळतोय आणि आज याने पण खेळायचे आणि तरव सर्व गोट्या त्या मूर्तीच्या समोर टाकल्या व ते बोलले बाप्पा रोज मीच तुझा डाव खेळतोय पण आज नाही, आज तूच खेळायचं बस इतके त्यांच्या तोंडातून शब्द निघतच धरणी कंपित होऊ लागली सर्वत्र ढग जमून अंधार होऊ लागला वारे वेगाने वाहू लागले आणि कोणालाच काही कळेना कि काय होतंय पण काय करणार ती अद्भुत शक्ती आज प्रकटणार होती आणि तिच्याच आगमनाची हि सूचना होती. आणि ज्याठिकाणी गणेश मूर्ती होती त्याठिकाणी धरणी दुभंगून एक ८ वर्षाची आतिशय तेजस्वी एक बालमूर्ती प्रकटली आणि तेच दुसरे तिसरे कोणीही नसून प्रत्यक्ष परब्रम्ह श्री स्वामी समर्थ महाराज. आणि तो विजयसिंग गोट्या खेळताना तेव्हा स्वामींकढून हरला आणि बालरूप स्वामिनी त्याला गोट्या उधार दिल्या आणि परत भेटण्याचे देऊन वचन तिथून ते गुप्त झाले.

'थोडक्यात स्वामींचा अवतार हा पंजाब प्रांतात हस्तिनापुर पासून १२ कोस (जवळपास २४ कि. मी. अंतरावर) छेली खेडा नावच्या गावात वटवृक्षाच्या जवळ गणेश मूर्तीच्या शेजारी शेजारी झाला. आता शंका हि उपस्थित होईल कि हि गोष्ट कशी काय कळली. पण यागोष्टीचा उलगडा आस झाला. कोकणातील हरिभाऊ (स्वमिसुत) हे अक्कलकोटला आले होते आपल्या ऐहिक इच्छापुरती साठी तेव्हा ते तिथे काही दिवस वास्तव्यला होते. आणि एक दिवस स्वामिनी त्यांना जवळ बोलावले मांडीवर घेतले सांगितले कि आजपासून तू माझा सुत झालास सर्व घरदार सोडून दे आणि दर्याकिनारी माझी ध्वजा उभी कर हे ऐकून हरीभाऊना रडू कोसळले कारण ते इथे ऐहिक इच्छापूर्ती साठी आले होते आणि महाराज तर सर्व सोडायला सांगता आहेत हे पाहून त्यांना थोड रडू कोसळलं तेव्हा स्वामी त्याला म्हणाले कि रडतोयस काय माझे पोट बघ किती मोठे आहे त्याच्यावर हात फिरव बघू. आणि ज्यावेळी हरीभाऊनी तसे केले त्यांना ध्यान लागले आणि त्यामध्ये त्यांना आपले सगळे जन्म आठवू लागले आणि त्यातील त्यांना एक आपलाच जन्म आठवला विजयसिंग म्हणजे दुसर तिसर कोणी नाही तर तो स्वमिसुतांचाच पूर्व अवतार होता.आणि त्यानंतर या सर्व गोष्टींचा उलगडा झाला. आणि या गोष्टीला स्वतः स्वामिनी मान्यता दिली आहे ती पुढील प्रमाणे.

'स्वामी प्रकटदिनाचा उत्सव स्वमिसुत महाराजांनी सुरु केला आहे. ज्यावेळी स्वमिसुत महाराज हा उत्सव अक्कलकोट मधे करत होते तेव्हा भुजंगा सारख्या भक्तांनी स्वामिना प्रश्न विचारला स्वमिसुत हे काय करत आहेत तेव्हा स्वामींचे उततर आसे होतेमाझा बाळ मी सदेह ज्या प्रकटलेल्या दिवसाचा उत्सव करत आहे.

'नाना रेखी नावाचे अहमदनगर चे स्वामीभक्त होते ते स्वमिसुतांच्या सांगण्यावरून अक्कलकोट ला आले होते तर ते पिंगला जोतिष्य विद्येत पारंगत होते. स्वामिनी त्यांना आज्ञा केली कि माझी कुंडली बनव तेव्हा त्यांना खूप आनंद झाला आणि त्यांनी लगेचच कुंडली बनवण्याचं काम सुरु केल. आणि काही दिवसातच कुंडली बनली आणि त्यातील स्वामी प्रकटण्याचा मजकूर वर प्रमाणे होता, तर ते ती कुंडली घेऊन स्वामींपाशी आले तेव्हा तिथे भजनाचा कार्यक्रम सुरु होता. तेव्हा स्वामींनी ती कुंडली भक्ताला सांगून माळ्यावर टाकायला सांगितली आणि ज्यावेळी कार्यक्रम संपला आणि परत स्वामिनी कुंडली आणण्याची आज्ञा केली तेव्हा त्या कुंडलीवर हळद, कुंकू, अक्षता, तुळस, फुले वैगेरे वाहून सर्व दैवतानि त्या कुंडलीची पूजा केली होती. आणि कुंडली पाहून स्वामींनी खूप खुश आणि नानांचा उजवा हात हातात घेऊन त्यांनी आपला हात हातात त्याच्या ठेवला आणि त्याच्या हातावर विष्णुपद उमटले स्वामींचे आत्म लिंग आणि ते त्यांच्या हयाती पर्यंत होते त्यांच्या हातावर. याचाच आर्थ स्वामिनी वरील कुंडलीला म्हणजे प्रत्यक्ष रित्या स्वामीसुतानी मांडलेल्या स्वामींच्या प्रकटन्यालाच मान्यता दिली आणि त्याचा प्रसाद म्हणून नाना रेखींच्या हातावर विष्णुपद उमटले. आणि आजही हि स्वामींची कुंडली स्वामींच्या अहमदनगर च्या मठात आहे. स्वामी समर्थ महाराज कादळींवनात योग्यांना मार्गदर्शन करायला येण्यापूर्वी ते जगात वेगवेगळ्या ठिकाणी स्वताचे खरे नाव, ओळख लपवून चंचलभारती, दिगंबर बुवा आशा नावाने सुद्धा कार्यरत होते.

'स्वामी समर्थ प्रकटदिन आपल्या सर्वांसाठी खुप मोठी महापर्वणी आजच्याच दिवशी हा 'अक्कलकोटस्थ परब्रह्म' आपल्या सर्वांच्या पुर्वपुण्याईने आपल्याला प्राप्त झाला होता. या भूतलावर अवतीर्ण होऊन सर्व जगतावर अंनत उपकार करणाऱ्या परब्रह्माचा आज प्रकट दिन वा जयंती महोत्सव आहे. हा महोत्सव कोट्यावधी स्वामी भक्तांना नव ऊर्जा, ध्येर्य, दिलासा आणि अगाध करुणा प्रदान करणारा आहे. सूर्याला तेज पुरविणारा आणि मातेच्या ऱ्हदयात ममता निर्माण करणारा, तेजरुपी मायासागराचा धनी असलेला, आपला 'श्री स्वामी देव' याच चैत्र शुध्द द्वितिया शके १०७१ (इ. स. ११४९) मध्ये छेली या खेडे गावी प्रकट झाला होता. आपल्या परब्रह्माचा जन्म जेवढा आश्चर्यकारक आहे, त्यापेक्षा लाख पटीने जास्त आश्चर्यकारक त्यांचे जीवन चरित्र आहे. हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे. इ. स. ११४९ ते १८७८ हा स्वामींचा अवतार काळ मानला जातो. परंतु ११४९ पुर्वी आणि १८७८ नंतर ही दृश्यादृश्य स्वरूपात स्वामींची लीला चालूच होती व आजही चालूच आहे. तेव्हा स्वामींच्या चरित्राचा शोध घेणे हे सूर्याला गवसणी घालण्यासारखे महाकठिण कार्य आहे. तरी सुध्दा दया सागर स्वामींनाच शरण जावून आपण स्वामींचा प्रकट दिन सोहळा श्री स्वामी सुत महाराजांच्या पुढिल अभंगातून पाहू या,

'श्री स्वामी समर्थ प्रकटदिन अभंग :-

दत्त माझा अवतरला । दीन भक्तांच्या काजाला ।।०१।।

छेलीखेड्या ग्रामामाजीं । झाला अवतार हा सहजी ।।०२।।

गोटी खेळण्याचा रंग । तेव्हां मनी झालो दंग ।।०३।।

तेथे होता विजयसिंग । आतां येथे करू रंग ।।०४।।

गजानन आनंदला । पाहुनियां त्या खेळाला ।।०५।।

नाचताती चहू कोणीं । नुपुरें वाजतीं चरणीं ।।०६।।

गोटी गोटीचा हा वाद । हरीचा हसण्याचा छंद ।।०७।।

हंसू लागे वक्रतुण्ड । हलवूनी प्रीती सोंड ।।०८।।

विष्णु स्तंभी प्रकटलें । दत्त गोटी फोडूनि आले ।।०९।।


माझ्या स्वामीचीं करणीं । कंप होतसे धरणीं ।।१०।।

गोटी विजयसिंग मारी । दुसरी गोटी होय करीं ।।११।।

गोटींचा हो पडला ढिग । चकित झाला विजयसिंग ।।१२।।

गोटी स्वामी माया झाली। स्वामीहस्तीं ती शोभली ।।१३।।

गोट्या झाल्या रानोमाळ। काय मौजेचा हा खेळ ।।१४।।



एक प्रहर खेळ केला । समर्थ दाविली ती लीला ।।१५।।

स्वामीसुत म्हणे झाला । अवतार भक्तांच्या काजाला ।।१६।।

'आपल्या या वरील अभंगात स्वामीसुतांनी स्वामी प्रकट दिनाचा प्रसंग वर्णन केला आहे. स्वामीसुतांनी स्वामींच्या प्रकट दिनावर भाष्य करणारे अनेक अभंग लिहिले आहेत. त्यापैकी हा एक आहे. ज्यातील स्वामी प्रकट दिन सोहळा आपण आज पाहणार आहोत. या अभंगाच्या सुरूवातीला स्वामीसुतांनी जो दत्त हा शब्द वापरला आहे, तो स्वामी महाराजांसाठी वापरला आहे. तर दत्त महाराजांसाठी अभंगाच्या मध्ये दत्त गोटी फोडूनि आले । हा उच्चार केला आहे.

'स्वामीसुत म्हणतात, माझा स्वामी जो अवतरला आहे, तो केवळ भक्तांच्या कल्याणास्तव ! भक्तांचा सांभाळ करणे, धर्माचे रक्षण करणे आणि अधर्मियांचा सर्वनाश करणे, हेच भंगवतांचे प्रमुख कार्य असते. याच कारणासाठी तो आपले नाव, रूप बदलून अवतार धारण करत असतो. पण या वेळी परब्रह्माने स्वत:च येणे केले आहे. त्याने कोणताही अवतार धारण केला नाही किंवा ईतर कोणत्याही देवतेला पाठविले नाही. तर प्रत्यक्ष पुर्ण परब्रह्म स्वत:च यावेळी आपल्या मुळ रुपात अवतीर्ण झाला. असे स्वामीसुत सांगतात. ही घटना कुरूक्षेत्रा (हस्तीनापूर) जवळील छेली या खेडी गावी घडली. जेथे हा परब्रह्म अगदी सहजतेने प्रकट झाला. सहजतेने शब्द वापरण्या मागचा उद्देश्य स्पष्ट दिसून येतो की, हा अवतार नवमास मातेच्या उदरी राहून प्रसूती पिडा सहन न करता झालेला आहे. म्हणजेच धरणी दुंभगून ०८ वर्षाची बालक मुर्ती प्रकट झाली.

'परब्रह्म ०८ वर्षाच्या बालक स्वरुपात अवतीर्ण होण्यामागचे कारण स्वामीसुत आपल्या अन्य एका अभंगात सांगतात, की हस्तीनापूर नजीक छेली ग्रामी भगवंताचा परमभक्त विजयसिंग हा गोटीला भगवंत मानून खेळ करीत होता. 'विजयसिंगे ही गोटी वटवृक्षछायेस गोमटी। भगवंत मानोनिया जगजेठी । मांडोनिया खेळतसे । नाव घेऊनि भगवंताचे गोटी आहे कौतूक त्याचे ।। असा खेळ तो बाळक खेळत असताना पुढे काय करत आहे पहा ! एकटाच बोले आपसांत । म्हणे देवबापा खेळ वेगी ।। असे म्हणत तो बालक स्वत:चा आणि भगवंताचा असे दोन्ही डाव स्वत:च खेळत होता. आपण आणि परमेश्वर वेगळे आहोत, हि भावनाच त्याच्यात नसल्यामुळे, तो हा खेळ खेळत होता. शेवटी अशा निष्पाप आणि निर्मळ मनाच्या बालकाचे अंत:करण आळखून आणि आपली प्रकट होण्याची योग्य वेळ आली आहे, हे जाणून स्वामींनी प्रकट होण्याचे ठरवले. एकदा प्रकट होण्याचे ठरवले की मग क्षणाचाही विचार न करता स्वामी महाराज हे भगवत्स्वरुपात नित्य मग्न असलेल्या आठ वर्षाच्या विजयसिंगाच्या निमित्ताने वटवृक्षाच्या झाडाखाली असलेल्या श्री गणेशांच्या साक्षीने परब्रह्म स्वरूपात प्रकटले.

'प्रकट झाल्यानंतर श्री स्वामी महाराज आपल्या विजयसिंग या भक्तांसोबत गोट्या खेळण्याची लीला दाखवित होते. या खेळात काही वेळाने अन्य दोन बालक ही सामिल झाले. आता स्वामी महाराज, विजयसिंग, रामसिंग आणि हरिसिंग असे चौघे मिळून हा गोट्याचा खेळ खेळत होते. (यातील हरिसिंग हाच पुढिल जन्मात हरिभाऊ म्हणून जन्माला आला व स्वामीसुत होऊन आपल्या मागिल जन्मातील आठवणी कथन करू लागला.) खेळताना स्वामी महाराज खुपच हट्ट करत होते. आपल्या मर्जीप्रमाणे वागत होते. स्वामींचा हा मनमानी खेळ व हेकेखोरपणा पाहून त्या वडाखाली असलेल्या मंदिरातील श्री वक्रतुंड गणेश हा स्वामींच्या या अद्भूत लिलेचे कौतूक करीत मोठमोठ्याने हास्य करीत आपल्या देवळातून बाहेर चालत आला. बाहेर येऊन तो ही लाला मौजेने पाहत उभा राहीला. सर्वजण गोटी खेळण्यात दंगून गेले. स्वामी महाराज ही मोठ्याने हास्य करत अगदी लहानाहून लहान होऊन तल्लीनतेने हा खेळ खेळू लागले. श्री गणेश भगवान आपली सोंड प्रेमाने गदगदा हलवून मोठ्याने हास्य करत या खेळाचा आनंद घेत होते.

'मुलांचा दंगा व स्वामींचा आणि गणेशांचा हास्य आवाज ऐकून ईतर देवतांना ही याबद्दल कुतूहल निर्माण झाले. आकाशात उभे राहून सर्व देवता हा अजब खेळ पाहायला गर्दी लागल्या होत्या. तेवढ्यात मुलांच्या बाजूलाच असलेल्या मंदिराच्या एका खांबातून श्री भगवान विष्णू प्रकट झाले, तर स्वामींनी फेकलेल्या एका गोटी मधून श्री दत्तात्रेय भगवान गोटी फोडून बाहेर आले. स्वामींच्या या कृत्यांने धरणी माता कंप पावू लागली. तशा मग ईतर देवता ही आकाशातून हा दिव्य खेळ पाहत पुष्प वृष्टि करत होते. यक्ष, गंधर्व, किन्नर नृत्य करत होते. हे होत असतानाच विजयसिंग स्वामींची एक एक गोटी जिंकत होता, लगेच स्वामींच्या हातात एक एक नवी गोटी येत होती. थोड्या वेळाने तेथे गोट्यांचा खुप मोठा ढिग जमा झाला, हे दृश्य पाहून विजयसिंग चकित होऊन गेला. स्वामी मायेने सर्वत्र गोटी दिसू लागली. शेवटी तीच स्वामींच्या हातात ही शोभून दिसू लागली. आजूबाजूला सगळीकडे रानोमाळ गोट्याच गोट्या दिसू लागल्या. हा खेळ पाहून सर्वजण मौज करत होते. संपूर्ण एक प्रहर भर हा खेळ स्वामींनी खेळून एक आगळी वेगळी लीला सर्वांना दाखविली. सर्वत्र मीच आहे. मी सर्वव्याप्त आहे. हाच संदेश स्वामींनी प्रकट होऊन दिला. प्रकट होताच गोट्याचा खेळ खेळून प्रब्रह्माने आपण ब्रह्मांडनायक असून या गोट्यासारखेच अनंत ब्रह्मांड माझ्या हाती असून मी त्याच्यांशी हवे तसे खेळतो. माझ्या ईच्छेशिवाय काहीही घडू शकत नाही. हाच बहूमोल संदेश दिला आहे.

'स्वामींच्या हातातील गोटी विषयी असाच एक प्रसंग शुरसेनानी २०१५ मध्ये आला आहे. तो पुढील प्रमाणे, श्री स्वामी समर्थ हातातील गोटीविषयी म्हणाले, 'असे सख्या तुला पाहायचे आहे का ते काय आहे?' असे म्हणून स्वामींनी ती गोटी खाली टाकली. तत्क्षणी गोटी ब्रह्मांडरूप होऊन तिचा स्फोट झाला. ब्रह्मांडाचे अधिक व्यापक दर्शन त्यात होऊ लागले. सहजलीलेने श्री स्वामीं देवांनी ते ब्रह्मांड आपल्या बोटात ओढून घेतले. तेव्हा ती पुन्हा गोटीच दिसू लागली. तेव्हा ती परब्रह्ममूर्ती पुढे म्हणाली, 'आम्ही हे धरून आहोत तोपर्यंत आहे. आम्ही सोडले की सारे संपले.' हा रोमांचकारी प्रसंग श्री स्वामी महाराज व परमपुज्य मामासाहेब देशपांडे यांच्या मधील असून, श्रीपाद सेवा मंडळ, पुणे या संस्थेचे अध्वर्यु शिरीषदादा कवडे यांच्या बरोबरील चर्चेवेळी समजला. (संदर्भ: शुरसेनानी २०१५ दिवाळी अंक)

'स्वामी भक्तांनो, स्वामी महाराजांनी प्रकट होऊन आपली पहिली लीला ही मुलांना दाखविली. यावरून स्वामींना बालकांविषयी असलेली ममता व स्नेह याची जाणीव होती. भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ, उपमन्यू बाळ यानांही परमेश्वर भेटला मात्र यासाठी त्यांना कठोर परिश्रम व दिर्घ स्वरुपाची साधना करावी लागली होती. येथे मात्र विजयसिंगाला अगदि सहजतेने आणि ते ही स्वत:प्रमाणेच बालक स्वरुपात प्रत्यक्ष परब्रह्म भेटला, त्याच्यांशी खेळला. यावरून परब्रह्माचे अथांग करूणा स्वरूप प्रकट होते. त्याची निर्मळ आणि निस्वार्थ भक्तांप्रती असणारी ओढ लक्षात येते. तेव्हा आपण ही आपले मन निर्मळ आणि निस्वार्थ ठेवण्याचा नेहमी प्रयत्न करावा, म्हणजे आपल्याला ही स्वामी महाराज आपलेसे करतील. हीच शिकवण देणारा आजचा अभंग आहे.

'अभंगावरील विवेचन झाल्यानंतर पुढे आपण आता स्वामींचे ओझरते चरित्र पाहण्याचा प्रयत्न करू या!

स्वामी महाराजांनी या मुलांचा उध्दार केल्यानंतर मग छेली या गावातील लोकांचा उध्दार केला. येथिल ग्रामस्थांना अनेक लीला दाखवल्या. स्वामींच्या आगमणाने छेली गाव हे गोकुळ बनले. जे भाग्य गोकुळ वासिंयाना भगवान श्रीकृष्णामुळे प्राप्त झाले, तेच भाग्य छेली वासियांना स्वामी कृपेने मिळाले. स्वामींच्या नाना लीला, असंख्य खेळ याचे साक्षिदार होण्याचे महत्भाग मिळाल्यामुळे छेली वासिय लोकांचे भाग्य विलक्षणच बनले. पंचक्रोशितील ग्रामस्थांचे तीर्थक्षेत्र बनलेल्या छेली गावचे दैवत 'श्री स्वामी देव' मात्र आपला मुक्काम अन्यत्र हलवण्याचा निर्णय घेते झाले. तेव्हा मग येथिल ग्रामस्थांचे कल्याण करून व त्यांना सत्य बोध करून स्वामी महाराज आपल्या पुढिल भ्रमंतीला निघाले. तेव्हा छेली ग्रामस्थांच्या दु:खाला पार उरला नाही. जी अवस्था श्री कृष्णांच्या गोकुळ सोडण्याच्या वेळी गोकुळ वासियांची झाली होती, त्याहून ही बिकट अवस्था छेली ग्रामस्थांची झाली होती. पण काहीही झाले तरी परब्रह्म आता मागे परत फिरणार नव्हते. त्यामुळे जड अंत:करणाने सर्वजण आपल्या घरी परतून स्वामी विरह दु:खात आकंठ बुडाले. इकडे स्वामी महाराज छेली गावातून निघून थेट हरिद्वारास गेले. पुढे ऋषिकेश येथे जावून तेथिल पुरोहितांमधील हरीहर भेद नाहीसा केला. हरी वेगळा आणि हर म्हणजे शिव वेगळा नसून हे दोन्ही एकच आहेत. याचा दाखला देऊन तेथिल काही भक्तांना आपले विश्वरूप दाखविले. यानंतर मग हिमालय पर्वतावर काही काळ निवास करून तेथून पुढे मग रुद्र प्रयाग, देवप्रयागला गेले. त्यानंतर मग काशी क्षेत्री स्वामींनी काही काळ निवास केला. त्यानंतर मग ब्रदिनाथ व केदारनाथ येथे भ्रमंती करून स्वामी पुढे सोमप्रयाग, नरनारायण स्थान येथून पुढे मग मानसरोवर येथे गेले. येथे काही काळ वास्तव्य करून मग स्वामी तेथून पुढे चीन आणि तिबेट या प्रदेशात गेले. येथून पुढे मग नेपाळ येथिल पशुपतीनाथ येथे काही काळ निवास केला. पुढे नंतर जगन्नाथपुरी, द्वारका, गिरणार पर्वत, कलकत्ता, रामेश्वर, हैद्राबाद, मुंबई, अंबेजोगाई, राजूर, पंढरपूर, हुमणाबाद, मोहोळ, मंगळवेढा, सोलापूर अशी भ्रमंती करत करत शेवटी अक्कलकोटी आले व येथेच स्थिर झाले. स्वामी महाराज अक्कलकोटी आल्यानंतर त्यांनी केलेल्या लीला व तेथिल चरित्र हे बऱ्यापैकी उपलब्ध असल्यामुळे याबाबत जास्त काही लिहिण्याची आज आवश्यकता नाही. पण *स्वामी महाराजांच्या छेली गावापासून ते अक्कलकोटी येईपर्यंतच्या प्रवासासंबधी व चरित्रासंबंधी खात्रीशिर आणि सुत्रबध्द माहिती उपलब्ध नसल्यामुळे याबाबतीत नेहमीच मत मतांतरे होत असतात. परंतु अक्कलकोटमध्ये स्वामींचे जवळपास २३ वर्षे वास्तव्य होते. आणि या काळात स्वामींनी दाखवलेल्या लीला, आपले सामर्थ्य, आपला सर्वेश्वराधिकार यागोष्टी पाहता, स्वामी महाराज हे पुर्ण परब्रह्म स्वरुप होते. या बाबतीत मात्र सर्वच चरित्रकारात एकमत आहे. आपण ही स्वामींच्या स्वरुपाबद्दल व शक्ती सामर्थ्याबद्दल स्वामी वैभव दर्शन भाग ०१ मध्ये सविस्तर माहिती घेतल्यामुळे ईतर मत मतांतरे यात न गुतंता स्वामींच्या सर्वेश्वर आणि पुर्ण परब्रह्म स्वरुपावर दृढ श्रध्दा आणि निष्ठा ठेवून, आपली पुढिल आध्यात्मिक वाटचाल करावी. स्वामी महाराजांना पुर्णपणे शरण जावे.

'श्री स्वामी समर्थ अर्थात अक्कलकोट स्वामी (प्रकटकाल: इ. स. १८५६-१८७८) हे इसवी सनाच्या १९ व्या शतकात होऊन गेलेले, महाराष्ट्रातीलअक्कलकोट येथील दत्त संप्रदायातील एक थोर संत होते. श्रीपाद वल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या नंतरचे भगवान श्रीदत्तात्रेयांचे ते तिसरे पूर्णावतार अवतार मानले जातात. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्रीस्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले अशीही बर्याच भक्तांची श्रद्धा आहे. मी नृसिंह भान असून श्रीशैलम्जवळील कर्दळी वनातून आलो आहे हे स्वामींच्या तोंडचे उद्गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवतात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले. श्रीस्वामी समर्थ (अक्कलकोट) संप्रदायदत्त संप्रदायभाषामराठीकार्यमहाराष्ट्र व कर्नाटकात दत्त संप्रदायाचा प्रसारप्रसिद्ध वचन'भिऊ नकोस,मी तुझ्या पाठीशी आहे'संबंधित तीर्थक्षेत्रेअक्कलकोट, गाणगापूर

'स्वामी समर्थ प्रकट दिन

इ.स. १८५६ च्या सुमारास स्वामी समर्थ अक्कलकोटास आले. ते मंगळवेढ्याहून पहिल्यांदा जेव्हा अक्कलकोट नगरीत प्रवेशले, तेव्हा त्यांनी गावातील खंडोबा मंदिरात मुक्काम केला. तो दिवस चैत्र शुध्द द्वितीया, शके १७७८, अनल नाम संवत्सरे, रविवार दि. ०६/०४/१८५६ हा होता.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

## व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा सत्कार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : राज्याचे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात...




### एटीएम कार्डची अदलाबदल करून वृद्धाला घातला गंडा

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात इसमाने फिर्यादी सिद्धलिंग मल्लय्या स्वामी (वय-६०,रा.अंबिका नगर,अक्कलकोट रोड) हे एसबीआय शाखा ट्रेझरी सोलापूर येथे पैसे काढत असताना त्यांना अडकलेले पैसे काढून देतो असे म्हणून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून एटीएम कार्डचा पिन बघून कार्डची अदलाबदल करत फिर्यादी सिद्धलिंग स्वामी यांच्या एटीएम मधून ७५ हजार रुपये काढून फसवणूक केल्याची घटना १७ ते १८ मार्च दरम्यान घडली. याप्रकरणी सिद्धलिंग स्वामी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार मुलांनी हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याचा घरगुती साहित्यावर डल्ला

सोलापूर : सिद्धेश्वर पेठ येथे बंद घराचे दार तोडून घरात प्रवेश करीत अज्ञात चोरट्याने घरातील १४ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि. ९ डिसेंबरला घडली. याप्रकरणी सादिकअली मोहम्मद युसूफ आबाजी (वय-६४-,रा.सिद्धेश्वर पेठ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी हे बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्याने घरातील दोन मोठ्या कड्या, एक लोखंडी साखळी, दोन लोखंडी उलताने, सहा सागवानी दरवाज्याच्या झडपा, तीन ते चार मोठी पातेली, दोन स्टीलच्या चहाच्या किटल्या यासह अन्य साहित्य असा एकूण १४ हजसा ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



## दूरसंचार अधिकार आणि विशेषाधिकार विषयावरील ग्राहक जागरूकता कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर : भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (ढठख) आणि वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (थखढ) यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनियरिंग तसेच इलेक्ट्रॉनिक अँड कॉम्प्युटर इंजिनियरिंग शाखेतील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी ग्राहक जागरूकता अभियान कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.

या अभियानात 'दूरसंचार अधिकार आणि विशेषाधिकार' या विषयावर प्रादेशिक प्रमुख आणि सल्लागार, ढठख प्रादेशिक कार्यालय, बेंगळुरूचे श्री ब्रजेंद्र कुमार यांनी सखोल मार्गदर्शन केले. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना ग्राहकांचे मूलभूत हक्क, विशेषाधिकार, सेवा वापरताना घ्यावयाची काळजी आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबद्दल त्यांनी विस्तृत माहिती दिली. ग्राहकांनी दूरसंचार सेवा अधिक प्रभावीपणे कशा वापराव्यात आणि त्यांच्या अभिप्रायाच्या आधारे सेवा सुधारण्यासाठी कोणत्या सूचना देता येतील, याविषयी देखील चर्चा झाली.

दुसऱ्या सत्रात सायबर क्राईम ग्रामीण पोलिस स्टेशन, सोलापूरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री रोहित पवार यांनी 'सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे आणि आर्थिक साक्षरता' यावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्याच्या उपाययोजनांबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत इलेक्ट्रॉनिक अँड कॉम्प्युटर इंजिनियरिंग विभाग प्रमुख डॉ. सचिन गेंगजे यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ संशोधन अधिकारी, ढठख प्रादेशिक कार्यालय, बेंगळुरूचे श्री के. मुरलीधर यांनी केले.

या कार्यक्रमाला इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनियरिंग विभाग प्रमुख डॉ. आशा थळंगे, प्राध्यापक, तसेच सोलापुरातील विविध टेलिकॉम सेवा प्रदात्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रोहिणी मेरगु, अमेय सांगोळे आणि रिया फरसुले यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शंका समाधान सत्राचे आयोजन करण्यात आले. आभार प्रदर्शन समन्वयक प्रा. श्रीशैल स्वामी यांनी केले.

ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून, त्यांनी दूरसंचार सेवा व सायबर सुरक्षेबाबत अधिक जागरूक राहण्याचे महत्व अधोरेखित केले.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने सुरेल मैफिल सप्तसुरांची उधळण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने आयोजित गुढीपाडवा या नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच सुशिल कुलकर्णी प्रस्तुत मैफिल सप्तसुरांची सुरेल कार्यक्रम संपन्न झाला.सुरुवातीला व्यवस्थापक मनोज श्रोत्री साहेब.आणि सह कलाकार यांचे शुभहस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली. गायिका योगिनी ताठे.स्वराली सावळे. गायक आप्पासाहेब चुंबळकर, प्रसाद खिस्ते व श्रीकांत कुलकर्णी आणि सुशील कुलकर्णी यांच्या सहभागाने सुरुवात झाली. सुरुवातीला पंचतुंड

**सुशील कुलकर्णी प्रस्तुत गुढीपाडवा निमित्ताने नवीन वर्षाची सुरुवात सुरेल मैफिलीने**

नलरुंड मालधर या नांदीने सुरेल सुरुवात होत आम्हीं विठ्ठलाचे वारकरी.देव देव्हाऱ्यात नाही.मी विकत घेतला शाम. थकले रे नंदलाला. माझे जीवन गाणे.पद्मनाभा नारायणा .झिनी झिनी वाजे बिन. मि तर जाते जत्रेला. अशा अनेक मराठी भावगीते भक्तिगीते विविध गाण्यांनी पंढरपूरकरांना मंत्रमुग्ध करत मराठी वर्षारंभाला सुंदर स्वरांची मेजवानी दिली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला सुशील कुलकर्णी हार्मोनियम आप्पासाहेब चुंबळकर, टाळ नंदकुमार कानडे यांनी करत संपूर्ण कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन ऋतुजा फुलकर यांनी करत कार्यक्रमाला आगळीवेगळी उंची निर्माण केली.यावेळी पंढरपूर नगरीतील अनेक संगीत कला रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. असेच कार्यक्रम सातत्याने विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांनी सादर करत सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी प्रयत्न व्हावा अशी विनंती रसिकांच्या वतीने करण्यात आली

## तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत विशेष शिबीराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर /जिमाका : सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० दिनांक १५ एप्रिल २०१७ अन्वये कोणत्याही क्षेत्रामध्ये अंतिम विकास योजना प्रसिध्द केल्यावर, अशा ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या वापरासाठी अशा जमीनीच्या वापराकरिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ प्रमाणे, कोणतीही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. अशा स्वरुपाची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ (ब) ही सुधारणा करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दि. १३ एप्रिल २०२२ परिपत्रकान्वये महाराष्ट्र जमीन महसूल कलम ४२ ब मधील तरतुदीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी कार्यवाही चालू आहे.

तसेच मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी त्यांचेकडील दि. १७ मार्च २०२५ च्या परिपत्रका नुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४२ (ब) या नियमान्वये केलेल्या सुधारीत तरतुदीच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अकृषिक आकारणी व रुपांतरीत कर भरुन घेवून नियमानुसार संबधित खातेदारांना अकृषिक सनद देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

सदर परिपत्रकानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ब नुसार अकृषिक सनद देणेबाबत खालीलप्रमाणे विशेष शिबीराचे आयोजन केलेले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब नुसार अकृषिक सनद मिळणेकामी अर्जदार यांनी अर्ज व कागदपत्रे तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर येथे सादर करणे व चलन भरणेकामी नोटीस प्राप्त करून घेणे. - दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.०३ एप्रिल २०२५

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब नुसार नोटीस दिल्यापासून अकृषिक आकारणी करुन नोटीस दिलेनंतर संबधित खातेदारांनी ते दि.०५ एप्रिल २०२५ शासकीय खजिन्यात अकृषिक आकारणीची रक्कम जमा करून चलन पर्यंत जमा केलेबाबतची पोहोच तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर येथे सादर करणे.- नोटीस दिल्यापासून ते ०३ एप्रिल २०२५ पर्यंत.


महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ब नुसार अकृषिक सारा व रुपांतरीत कर शासन जमा करुन घेतलेनंतर शिबीर आयोजीत करुन विहीत नमून्यात सनद देणेबाबत कार्यवाही करणे, -दि. ०९ एप्रिल २०२५


वरील कार्यक्रमाप्रमाणे तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत सदर शिबीर आयोजीत केलेले आहे. तरी सदर शिबीराचा सर्व खातेदारांनी लाभ घ्यावा असे, तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत आवाहन करण्यात येत आहे.


यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे- अर्ज, चालू तारखेचा ७/१२ उतारा, खरेदीखत, इंडेक्स, झोन दाखला (तहसिल स्तरावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.), स्वयंघोषणापत्र (तहसिल कार्यालय येथे उपलब्ध करून दिले जाईल.)

**ग्रा.प.ने गावात मुख्य चौकात सीसी टिव्ही कॅमेरे बसवावेत** — **ग्रामस्थातून मागणी**

# वागदरी येथे एकाच रात्री तिन घरात चोरी, नागरिकात घबराट; अंदाजे तिन लाख रुपयाचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालूक्यातील वागदरी येथे चोरट्यांचा सुळसुळाट उठला असून दि.३० व ३१ मार्च २२५ च्य मध्य रात्री येथील तिन घरावर चोरट्याने डल्ला मारून अंदाजे तिन लाख रुपयाचा मुद्दे माल लंपास केला आहे.

या बाबत घटनास्थळावरून मिळालेली माहीती असी की, दि.३ मार्च रोजी गुडी पाडव्याच्या दिनी रात्रीच्या सुमारास पूरणपोळी सह गोड धोड खावून गाढ झोपेत गाव असताना दि.३१ मार्चच्या मध्यरात्री चोरट्याने शरद धरम पवार यांच्या घरात प्रवेश करणाऱ्या जिन्याद्वारे घरात प्रवेश केला. घरातील सर्वजण गाढ झोपेत होते. घराचे आतील दरवाजे सर्व उघडेच होते. चोर पावलाने चोरटे घरातील कपाट ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी गेले.पोट माळ्यावर ठेवलेली कपाटाची चावी चोरटयाच्या हाती लागली असता चोरट्यानी कपाट उघडून दिड तोळ्याचे सोन्याचे दागीने, देवकार्यासाठी ठेवलेले १६,०००/- रुपये रोख रक्कम,१३,०००/- रु. किमतीचा हँड्रॉईड मोबाईले, ६०००/- रुपयाची साडी, ७०००/ रु. किंमतीचे चांदीचे दागीने अरो अंदाजे एक लाख सत्याऐंशी रुपये (१,८७०००/- ) चा मुद मुद्देमाल चोरटयाने हाडप केला तर येथील भरत राम माडजे यांच्या घराता बाहेरून कुलूप असल्याचे चोरटयाना दिसले. घरात कोणी नाही याचा फायदा घेत त्यानी घराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात घुसले व कपाटात ठेवलेले १०,०००/- रुपये रोख, अर्धा तोळ्याचे सोन्याचे दागीने १४,०००/- रुपयाचे चांदीचे दागीन असे एकून ६४,०००/- रुपयाचा मुद्दे माल घेवून घरातील सामान अस्थाव्यास्थ टाकून निघून गेले.तसेच शरद पवार यांच्या जिन्याचा अधार घेत येथील रामचंद्र यादव यांच्या जिन्यावरून त्यांच्या वरच्या मजल्यावर जावून एका खोलीत चोरटे घूसले. तेथून ही यादव यांचा १८,०००/- रुपये किमिंतीचा मोबाईल,१४,०००/- किमिंतीचा शालू व ५००० रुपये रोख रक्कम असे एकून ३७,०००/- चा मुद्दे माल चोरट्याने लंपास केला.असा प्रकारे वागदरी येथे तिन घरे फोडून अंदाजे एकूण २,८८,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्याने हडप करून निघून गेले. काही किंमती वस्तूही चोरट्याने चोरल्या आहेत असे एकून अंदजे तिन लाख रुपयाचा मुद्देमाल चोरट्यानी हडप केला असून सदर घटनेमुळे येथील ग्रामस्थामध्ये भितीचे वातावरण निर्मान झाले असून नळदुर्ग पोलीसा समोर हे एक मोठे आव्हान उभे राहीले आहे. त्यामुळे नळदुर्ग पोलीसानी रात्रीच्या वेळेची गस्त वागदरी पर्यंत वाढवावी असी मागणी ग्रामस्थातून होत आहे. यापूर्वी ही वागदरी शिवारातून रास करून ठेवलेले सोयाबिन, दावनीला बांधलेले गायी, म्हैसी चोरट्याने चोरून घेवून गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या सर्वं बाबीचा विचार करून ग्रा.प.ने गावात मुख्या चौकात सीसी टिव्ही कॅमेरे बसवावेत असी मागणीही येथील ग्राम स्थातून होत आहे..

## सरपंच तुकाराम पाटील यांचा वाढदिवशी अपघाती निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट : तालुक्यातील रुद्देवाडी येथील सरपंच तुकाराम पाटील यांचा ७८ व्या वाढदिवशी काळाने झडप घातल्याने रविवारी रात्री आठ वाजण्यांचा सुमारस अपघाती निधन झाले असून रुद्देवाडी येथील त्यांच्या शेतात सोमवारी दुपारी मोठ्या शोककळात अंत्यविधी करण्यात आला.

सोलापूर जिल्हा परिषदेत ३४ वर्ष शाखा अभियंता या पदावर काम पूर्ण करून सेवानिवृत्त झाले होते. अक्कलकोट तालुक्यातील रुद्देवाडी येथे गेल्या दोन वर्षापूर्वी थेट सरपंच निवडणुकीत तुकाराम पाटील मोठ्या मताने विजय झाला होता. विकाससाठी मोठा निधी आणून गावंचा चेहरा मोहरा बदलून टाकला होता. रविवारी रात्री आठच्या सुमारास अफजलपुर जवळ काळाने झडप घातल्याने अपघाती निधन झाले आहे.या अपघाती निधनाने कर्नाटक महाराष्ट्र सीमा भागात हळहळ व्यक्त होत असून रुद्देवाडी गावावर शोककळा पसरली आहे. त्यांचा पश्चात पत्नी तिनं मुलगा सून नातं नातवंडं असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधीस आमदार सचिन कल्याणशेट्टी सह त्यालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक,सोसायटी चे अरमन,सेक्रेटरी,शाखा अभियंता, शासकीय अधिकारी कर्मचारी सह आदी जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**थोडक्यात...**




### लहान मुलाची मस्करी केल्याच्या कारणावरून दोन गटात मारामारी

सोलापूर : लहान मुलाची मस्करी केल्याच्या कारणावरून किरकोळ तक्रार झाली व त्यातून मोठे भांडण झाले. फिर्यादी सुरज शंकर आखाडे यांची वहिनी प्रांजली आखाडे व आई या दोघींना वैष्णवी मिसाळ, सुनीता मिसाळ,अजय जेटीथोरचा भाऊ (रा. सर्वजण रमाबाई आंबेडकर नगर) यांना मारहाण केली.तर अजय संतोष जेटीथोर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज शंकर आखाडे,धीरज आखाडे, पंकज शंकर आखाडे ,मनोज शंकर आखाडे (रा.सर्व आंबेडकर नगर,सोलापूर) यांनी शिवीगाळ करून विटेचा तुकडा फिर्यादीच्या मानेवर मारून तसेच फिर्यादीच्या आईच्या डोक्यावर मारून जखमी केले.याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात ७ जणावर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पडघ्यात बोहाडा यात्रा मोठ्या उत्साहात

## मुखवटे परिधान केलेली सोंगं नाचवण्याची अनोखी परंपरा कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यात प्रसिद्ध बोहाडा यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. विविध मनोरंजनाची खेळणी दाखल झाली होती. गुढीपाडव्याला पडघे येथे भरणारी पारंपरिक बोहाडा यात्रा पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. अनेक नागरिक यात्रेत सामील झाले होते. बोहाडाच्या दिवशी कान्होबा मंदिर पासून ते वेशीपर्यंत पारंपरिक वाद्याच्या तालावर देवी-देवतांची वेशभूषा आणी मुखवटा परिधान केलेली सोंगं नाचवण्याची अनोखी परंपरा पडघेकरांनी आजपर्यंत टिकून ठेवली आहे. सोंगं बघण्यासाठी अनेक नागरिकांनी गर्दी केली होती.





**यावेळी पडघ्यातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा आकाशी पाळणे, होडी पाळणे, छोटी आगगाडी, छोट्या मुलांचे पाळणे, चक्री पाळणे, खाण्याची स्टॉल तर विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. यंदा गुढीपाडवा रविवारी या सुट्टीच्या दिवशी आल्याने या बोहाडा यात्रेत मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. मुख्य रस्त्यावर पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची तसेच विद्युत व्यवस्था करण्यात आली होती.**

यात विविध देवतांची सोंगं नाचवली जातात. देवी-देवतांचे मुखवटे परिधान केलेली ही सोंगं मंदिरापासून गावाच्या वेशीवर नाचत जाऊन पुन्हा येतात. त्याच प्रमाणे अनेक वर्षांपूर्वीची ही प्रथा अशीच कायम रहावी म्हणून सर्व धर्मीय मोठ्या उत्साहात या सगळ्यात भाग घेतात. शिवाय या बोहाडा यात्रेची परंपरेमुळे गावातील ऐक्य टिकून राहत असल्याचं मत पडघ्या गावातील ज्येष्ठ नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरवर्षी गुढीपाडवा उत्सवाला भिवंडी तालुक्यातून तसेच परिसरातून मोठा प्रतिसाद मिळतो. या यात्रेच्या उत्सवात सर्व जाती धर्मांची नागरिक एकत्र येऊन हा उत्सव दरवर्षी गुण्यागोविंदानं मोठ्या उत्साहात साजरा करतात. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पडघा पोलिस स्टेशनच्या माध्यमातून विविध ठिकाणी पोलिस तैन्यात करण्यात आले होते.

# अक्कलकोट येथे हिंदु नववर्ष महोत्सव समितीच्या वतीने भव्य शोभायात्रा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट ता.३१ गुढीपाडवा हिंदु नववर्षानिमित्त अक्कलकोट येथे हिंदु नववर्ष महोत्सव समितीकडुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत पारंपारिक वाद्यासह फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. शेकडो हिंदू बांधव या शोभायात्रेत सामील झाले होते. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

श्री मल्लिकार्जुन मंदिर येथुन शोभायात्रेची सुरूवात करण्यात आली. विविध पथक, पारंपारिक वाद्य,पारंपारिक वेशभूषा परिधान करून शहरातील विविध समाजातील नागरिक,बंधुभगिनीं मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शोभायात्रेत भगवा ध्वज पथक,बँजो, हलगी पथक, वारक-यांचे दिंडी पथक, हिंदु धर्मातील विविध समाजाचे दैवत, महापुरुषांचे, संत, समाजसुधारक यांची प्रतिमा, बॅनर, कटआऊट रिक्षांवर लावुन लहान मुले, महिला, पुरुष या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, समर्थ नगर ग्रामपंचायतचे प्रदिप पाटील, शोभायात्रा प्रमुख आनंद खजुरगीकर, सहप्रमुख ऋषीकेश लोणारी, रा.स्व.संघाचे तालुका संघचालक रवींद्र जोशी, तालुका कार्यवाह चेतन जाधव, सहकार्यवाह संतोष वगाले, गुंडुअण्णा येळमेली, तम्मामामा शेळके, शिवशरण जोजन, संजय भागानगरे, राजु एकबोटे, प्राचार्य डॉ.शिवराया अडवितोटे, प्रसाद हारकुड, महेश वागदरे, आनंद देसाई, यश कुलकर्णी, स्वामीनाथ बेंद्रे यांसह विविध समाजाचे अध्यक्ष, कार्यकर्ते सहभागी झाले होते. शोभायात्रेचे समारोप श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे करण्यात आले. अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी शोभायात्रेचे स्वागत केले व उपस्थित सर्वांना अल्पोपहाराची व्यवस्था अन्नछत्र मंडळाकडून करण्यात आली.

**अक्कलकोट येथील कारंजा चौक येथे मुस्लिम समाजातर्फे शोभायात्रेच्या प्रमुख मंडळींना माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, अशपाक बरोलगी व मुस्लिम बंधूंनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शोभायात्रेत सामील झालेल्या हिंदू बांधवांना पाण्याची बॉटल देऊन एक आदर्श सर्वांसमोर ठेवला. याप्रसंगी माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, नुर शेरिकर, अशपाक बरोलगी,इरफान दावणा, शूकुर शेख, रफिक पठाण, मुर्तुज बाजे, सोहेल फरास, हुसेन बळोरगी, एसएम सोशल ग्रूपचे कार्यकर्ते व मुस्लीम बांधव आदीनी मुस्लिम समाजातर्फे स्वागत केले.**

## पुनर्वसन प्रकल्पांना गती उपमुख्यमंत्री कार्यालयात समन्वयक कक्ष स्थापन : मंत्री शंभूराज देसाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयात विशेष समन्वयक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामार्फत प्रकल्पांचा आढावा घेऊन जिथे सुधारणा आवश्यक आहेत, तिथे त्वरित सुधारणा करून प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत नियम २९३ अन्वये ठरावाला उत्तर देताना सांगितले.

मंत्री देसाई म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील प्रत्येकाला घर ह्या योजनेला २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरांतील एसआरए प्रकल्प तसेच म्हाडाच्या डेव्हलपमेंट प्रकल्पांसाठी गृहनिर्माण विभाग विशेष नियोजन करून त्यांचे नियमित मॉनिटरिंग करणार आहे. परवानग्यांसाठी होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प रखडणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल. म्हाडाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा विषय अद्याप न्यायप्रविष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

# अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन सोहळा मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.



श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे पहाटे ५ वाजता काकड आरती, त्यानंतर पाळणा सोहळा आणि जन्म सोहळा भक्तीभावाने पार पडला. दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे वितरण, तर संध्याकाळी पुण्यातील गायिका जया कर्णिक यांचे भजन कार्यक्रम संपन्न झाले.

या निमित्ताने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाखो भाविकांनी लाभ घेतला. तसेच अन्नछत्र मंडळ येथे पाळणा सोहळा पार पडला, ज्यामध्ये चांदीच्या पाळण्यासह आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. तसेच श्री स्वामी समर्थ समाधी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती व धार्मिक कार्यक्रम पार पडले.

या प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, पुण्यातील उद्योगपती विशाल धुमाळ, नाशिकचे उद्योगपती संजय गायकवाड आदी मान्यवरांनी व लाखो भाविकांनी स्वामींचे दर्शन घेतले.

या सोहळ्यात हजारो भक्त सहभागी झाले होते, आणि अक्कलकोट शहर संपूर्ण स्वामीमय झाले होते.

# बुद्धगया महाबोधी महाविहार येथे केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली बुद्धपूजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुद्धगया / मुंबई : महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्धांना जिथे ज्ञान प्राप्ती झाली त्या बुद्धगया येथील पवित्र बोधिवृक्ष आणि महाबोधी महाविहारात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज सहकुटुंब बुद्धपूजा केली. महाबोधी महाविहारात बुद्धवंदना घेण्यात आली.त्यानंतर महाबोधी वृक्षाखाली देशविदेशातील अनेक बौद्ध भंतेंच्या उपस्थितीत ना.रामदास आठवले यांनी



सहकुटुंबबुद्धपूजाकेली.यावेळी ना.रामदास आठवले यांच्या मातोश्री दिवंगत हौसाआई आठवले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बुद्धपूजा आणि भिक्खू संघाला संघदान भोजनदान देण्यात आले.यावेळी ना. रामदास आठवले य यांच्या पत्नी सौ.सीमाताई आठवले आणि आठवले परिवारातील अनेक कुटुंबीय उपस्थित होते.

महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाचा सक्रिय पाठिंबा आहे.महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेणार असा निर्धार ना.रामदास आठवले यांनी केल्या नंतर ते महाबोधी महाविहार येथे आल्या नंतर बौद्ध भिक्खू आणि बौद्ध उपासकांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

यावेळी महाबोधी महाविहार ट्रस्ट च्या व्यवस्थापनाने ही ना.रामदास आठवले यांचे स्वागत केले.यावेळी भदंत हर्षबोधी ; भदंत आनंद महास्थवीर ;भदंत प्रियपाल महास्थवीर; भदंत प्रज्ञादीप महास्थवीर; भदंत आनंद महास्थवीर; भदंत शासन पाल ; भदंत ज्ञानवंश आणि थाय लँड म्यानमार; कंबोडिया; श्रीलंका; बांगलादेश; व्हिएतनाम आदी अनेक देशांचे बौद्ध भंते उपस्थित होते.महाबोधी महाविहार ट्रस्ट च्या महाश्वेता महारथी; मेंबर डॉ अरविंद सिंग; प्रकाश जाधव; सचिनभाई मोहिते; सुबोध भारत; मंजू छिबेर; शिवनारायण मिश्रा; चंदन शर्मा; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

**शेतकरी कैलास येरणे चिंताग्रस्त**

**बोळदे कवठा शिवारात रानगव्याचे थैमान**

# रानगव्याने केली तब्बल एक एकराच्या धान रोवणीची नासधूस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


बाराभाटी : जवळच्या बोळदे कवठा शिवारातील रब्बी धान रोवणी पिकांची रानगव्याने मोठ्या प्रमाणावर तब्बल एक एकराची नासधूस केली आहे. या जंगली प्राण्यांच्या प्रकाराने शेतकरी चिंताग्रस्त होवून फार वैतागून गेले आहेत. वनविभागाचे दुर्लक्ष आहे.

खरीपानंतर रब्बी धान पिकांची परिसरात मोठ्या प्रमाणावर रोवणी करण्यात आली आहे. अशातच शेतकरी पाण्याचा योग्य वापर करून धान पिकांची लागवड झाली की भरघोस पीक यावे यासाठी खूप मेहनत करून उत्तम शेती पिकवली जाते. गेल्या काही दिवसापासून जंगली प्राणी रानगवा या प्राण्यांनी कैलास येरणे यांच्या शेतातील फारच मोठ्या प्रमाणात धान पिक रोवणीची नुकसान केली आहे.

**विभागाने नुकसान भरपाई दयावी**

बोळदे कवठा शिवारातील शेती ही नवेगावबांध या वनपरिक्षेत्र भागात येत असून, रानगव्याने धान पिक रोवणीची नुकसान केल्यामुळे नवेगावबांध वनपरिक्षेत्र अधिकारी यांना माहिती दिली असता त्यांनी जंगली प्राण्यांसाठी काहीच





करता येत नाही असे म्हणून टाळाटाळ केली आहे. या प्रकाराने शेतकरी हतबल झाले पण भरपाई यावर काहीच न बोलता, पंचनामे अजूनही करण्यात आले नाही.

## मुक्ताई आणि कुटुंबाचा जीवन प्रवास उलगडणारा 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपट १८ एप्रिलला प्रदर्शित : दिग्पाल लांजेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सामाजिक छळवादाने होरपळून निघालेल्या विठ्ठलपंतांच्या पोटी निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई या विभूती जन्मास आल्या, ज्ञानसाधना, जीवनाविषयी अनासक्ती, कठोर वैराग्य हीच ज्ञानेश्वरादी भावंडांना वारसा म्हणून लाभलेली संपत्ती होती. वैयक्तिक आत्मोद्धाराला लोकोद्धाराची जोड देऊन आत्मकल्याण आणि विश्वकल्याण साधणाऱ्या मुक्ताई आणि त्यांच्या कुटुंबाचा जीवनप्रवास उलगडून दाखविणारा 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट १८ एप्रिलला प्रदर्शित होत असल्याची माहिती दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी मंगळवारी दुपारी एका पत्रकार परिषदेत दिली.

'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाची प्रस्तुती ए.ए. फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे. या चित्रपटात आव्हानात्मक संत ज्ञानेश्वरांच्या भूमिकेत अभिनेता तेजस बर्वे तर संत मुक्ताईची भूमिका नेहा नाईक दिसणार आहेत. या चित्रपटाची निर्मिती रेश्मा कुंदन थडानी यांनी केली असून लेखन स्वतःचे असल्याचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी प्रारंभी म्हटले.

यापूर्वी संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनावर प्रभात ने प्रदर्शित केला होता, ८४ वर्षानंतर 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट घेऊन मराठी सिनेरसिकांपर्यंत येत आहोत. 'संत मुक्ताई' च्या अलौकिक स्वरूपात, मातेचे वात्सल्य, कारुण्याचा परमोत्कर्ष, भगिनीचा अवखळपणा, ज्ञानाचा निरंतर वाहणारा झरा यांसारख्या अनेक गोष्टी एकाच वेळी प्रकटलेल्या पाहायला मिळतात. मुक्ताई संत ज्ञानेश्वरांच्या प्रेरणास्थान होत्या.

या चित्रपटात संत निवृत्तीनाथांच्या भूमिकेत अक्षय केळकर तर संत सोपानकाकांची भूमिका सूरज पारसनीस यांनी साकारलीय. यासोबत समीर धर्माधिकारी, मृणाल कुलकर्णी, अजय पुरकर, मनोज जोशी, योगेश सोमण, स्मिता शेवाळे, सचिन देशपांडे, अभिजीत शवेतचंद्र, नुपूर दैठणकर, आदिनाथ कोठारे यांच्यासुद्धा चित्रपटात भूमिका आहेत.